*This Question Paper contains 16 printed pages.*
***(Part - A & Part - B)***

Sl.No. 0201324

| પ્રશ્ન પેપરનો સેટ નંબર જેની સામેનું વર્તુળ OMR શીટમાં ઘટ્ટ કરવાનું રહે છે. Set No. of Question Paper circle against which is to be darken in OMR sheet. |
|---|
| **02** |

# 03(M)

**(MARCH, 2017)**

**Part - A : Time : 1 Hour / Marks : 50**
**Part - B : Time : 2 Hours / Marks : 50**

## (Part - A)

***Time : 1 Hour]*** ***[Maximum Marks : 50***

**सूचना :**

1) दिलेल्या प्रश्न पत्रिकेत **Part – A** मध्ये वस्तुनिष्ठ प्रकारचे एकून **50** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न आवश्यक आहे.
2) प्रश्नांची क्रम संख्या 1 ते 50 आहे. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण आहेत.
3) प्रश्न पत्रिका ठिक पद्धतीने वाचने आणि योग्य पर्याय / विकल्प लिहा.
4) आपल्याला वेगळे दिलेले **O.M.R.** शिट मध्ये प्रश्नाच्या समोर **(A) O, (B) O, (C) O** आणि **(D) O** दिले आहे. ज्या प्रश्नाचे उत्तर योग्य आहे, ते विकल्पास गोलाकारा पेनने पूर्ण घट्ट (●) करायचे आहे.
5) दिलेल्या प्रश्नपत्रिकेत वरच्या बाजूस प्रश्न पत्र शीट नंबरला **O.M.R.** शीट मध्ये उपलब्ध स्तंभ (कॉलम) मध्ये लिहा.

---

1) विलक्षण बुद्धिमत्तेचा आलोक वयाच्या कोणत्या वर्षी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता चाचणीमध्ये उत्तीर्ण झाला?
   (A) बाराव्या
   (B) नवव्या
   (C) आठव्या
   (D) तेराव्या

2) जगणे आणि वागणे, बोलणे आणि चालणे, सांगणे आणि करणे या जीवनसतारीच्या तारा तरलतेने छेडणारे, ह्या जीवनसंगीताचे दिग्दर्शक प्राचार्य. शिवाजीराव भोसले यांच्यामते कोण आहेत?
   (A) स्वामीजी (B) महर्षि कर्वे
   (C) रामकृष्ण (D) स्वामी दयानंद सरस्वती

3) 'महाराष्ट्र फाउन्डेशन पुरस्कार' हा पुरस्कार महाराष्ट्रातील – कोणत्या कवीस मिळालेला आहे ?

(A) भालचंद्र नेमाडे
(B) कुसुमाग्रज
(C) केशवसुत
(D) नारायण सुर्वे

4) 'हे बंध रेशमाचे' या कवितेच्या कवियित्री श्रीमती शांता शेळके यांचा कालखंड कोणता आहे ?

(A) इ.स. 1930 - 2005
(B) इ.स. 1912 - 2003
(C) इ.स. 1922 - 2003
(D) इ.स. 1932 - 2008

5) समर्थ संप्रदाय – दत्तसंप्रदाय – नाथसंप्रदाय आणि वारकरी संप्रदाय, यापैकी वारकरी संप्रदायाचा पाया कोणी रचला ?

(A) श्री. ज्ञानेश्वर
(B) समर्थ रामदास
(C) श्रीपाद वल्लभ
(D) श्री. निवृत्तीनाथ

6) तालुका – हिंगणी, जिल्हा अकोला येथे जन्म झाला, 'देवकीनंदन गोपाला' या चित्रपटाचे पटकथा लेखन करणारे, 'काया मातीत मातीत' हा प्रसिद्ध काव्यसंग्रह आपल्या नावावर आहे; असे आपल्या पाठ्यपुस्तकातील कवी कोण ? शोधा.

(A) इंद्रजीत भालेराव
(B) वि. वा. शिरवाडकर
(C) केशवसुत
(D) विठ्ठल वाघ

7) ज्ञान व भक्तीची उपासना करीत वयाच्या 72 व्या वर्षी – कोण समाधिस्थ झाल्या ?

(A) बहिणाबाई
(B) जनाबाई
(C) मुक्ताबाई
(D) सोयराबाई

8) '<u>आस</u>' शब्दाचा अर्थ शोधा ...........

(A) अश्रू
(B) हसणे
(C) इच्छा
(D) असणे

9) भूपाळया, आरत्या, कटाव, दीर्घकाव्य, आख्यानकाव्य अशी काव्यरचना करणारे कवी अमृतराय कोणाचे शिष्य होते?

(A) मध्वमुनीश्वरांचे (B) जनार्दनस्वामींचे

(C) चक्रधरस्वामींचे (D) निवृत्तीनाथांचे

10) 'भला जन्म हा तुला लाधला' या काव्याचे कवी कविप्रवर रामजोशी यांच्या आयुष्यात कोणामुळे परिवर्तन आले?

(A) शाहीर धोंडीमुळे (B) मोठेभाऊ मुद्गल शास्त्रींमुळे

(C) वडिल – जगन्नाथामुळे (D) कवी मोरोपंतामुळे

11) या देशांत कोणती यंत्रे अखंडित चालू असतात?

(A) माणूसकीची (B) कपड्याची यंत्रे

(C) मोटार गाड्यांची यंत्रे (D) अवजारं बनविण्याची

12) देगलूर येथे मराठी विषयाचे प्राध्यापक आहेत, असे – श्री. लक्ष्मीकांत तांबोळी यांची कोणती कविता आपल्या पाठ्यपुस्ताकात अभ्यासाला आहे?

(A) शांत किनारा (B) रस्ते

(C) वैभव (D) नाही नदी, नाही नाला

13) गोमतंक कवी बा.भ. बोरकर यांनी 'तेथे कर माझे जुळती' या कवितेत कोणता दृष्टीकोन व्यक्त केलेला आहे?

(A) लोकांच्या मनाला सहज व कायम आवाहन करणारा ..............

(B) आशावादी – प्रेरणादायी ..............

(C) मानवजातीच्या दिव्यत्त्वाचा ..............

(D) सामाजिक वास्तववादी ............

14) 'दोन – दिवस' या कवितेचा साहित्यप्रकार कोणता आहे? ते शोधा.

(A) शाहिरी काव्य

(B) जानपद काव्य

(C) आत्मचिंतनात्मक काव्य

(D) भावकाव्य

15) 'देवा, ह्याही देशात पाऊस पाड' या कवितेचे कवी दिलीप चित्रे यांचा जन्म आणि माध्यमिक शिक्षण कोणत्या गावी झाले?

(A) बडोदे (B) पुणे

(C) मुंबई (D) अमदाबाद

16) कवीचे मन कोणत्या आठवणीने भरून येते?

(A) जेंव्हा कवीला प्रेयसीचा प्रेमळ स्वभावाची आठवण होते, तेंव्हा मन भरून येते.

(B) बऱ्याच दिवसानंतर प्रेयसी भेटताच कवीचे मन भरून येते.

(C) जेंव्हा कवीला प्रेयसीच्या येण्याची चाहूल लागताच; त्याचे मन भरून येते.

(D) जेंव्हा कवी प्रेयसीच्या डोक्यातील केवड्याचे पान पुस्तकात – पुस्तकात पाहताच, त्याच्या मनातील जुन्या आठवणी आठवताच मन भरून येते.

17) 'मध्यरात्री नभघुमटाखाली, शांतिशिरीं तव चवऱ्या ढाळी. त्यक्त, बहिष्कृत मी ज्या काळी' या काव्यपंक्ती कोणत्या कवितेमधील आहेत?

(A) तेथे कर माझे जुळती.

(B) दोन दिवस

(C) हे बंध रेशमाचे

(D) देवा, ह्याही देशात पाऊस पाड.

18) पालचंद हिराचंद यांना <u>उद्योग महर्षी</u> म्हणत – अधोरेखित शब्दाचा समास प्रकार ओळखा :–

(A) तत्पुरूष (B) द्वंद्व

(C) बहुव्रीही (D) मध्यमपदलोपी

19) 'तंटा तोडण्यासाठी उभय पक्षांनी मान्य केलेले लोक —' या शब्दसमूहासाठी एक शब्द निवडा :–

(A) सभाजन (B) पंच

(C) गावप्रमुख (D) मान्यवर

20) 'मिटल्या मुठीत चांदीच्या पेल्याचा मुटका केला त्यांनी' – या वाक्यातील अलंकार ओळखा :–

(A) व्याजोक्ती (B) उत्प्रेक्षा

(C) उपमा (D) अतिशयोक्ती

21) '<u>रूपक</u>' अलंकाराचे उदाहरण शोधा:

(A) प्रत्येक काम कसं अगदी आरशासारखं !

(B) मुंगी शिलायलाही जागा उरायची नाही.

(C) पौर्णिमेच्या चंद्राच तेज असलेला षड्ज लागला की वातावरण कसं उजळून निघायचं.

(D) ती नवऱ्याची अशी सेवा करी की तिच्यासारखी तीच !

22) '<u>भूपाळ जो मम मनोमुकुरी उभासे</u>' – या चरणातील वृत्त ओळखा :–

(A) शार्दूलविक्रीडित

(B) मालिनी

(C) भुजंगप्रयात

(D) वसंततिलका

23) खालील पद्यचरणातील 'पृथ्वी' वृत्ताचे उदाहरण शोधा

(A) भासे सारे जग उपवनासारखे रम्य गोड.

(B) तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हा घडो।

(C) असा तूं सर्वांचा मुकुट म्हणुनी नाव दिधले.

(D) एखादे फुटके नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारिते.

24) ताळ्यावर आणणे – या वाक्प्रचाराचा अर्थ शोधा

(A) समजावून घेणे

(B) जाऊन आणणे

(C) परीक्षा घेणे

(D) योग्य समज देणे

25) "मी माझ्या मित्रांना त्यांच्या कामात पुष्कळ मदत केली पण शेवटी त्याने मलाच दोष दिला, म्हणतात ना" ............. खाली विकल्पात चार म्हणी दिलेल्या आहे; त्या चार म्हणींपैकी खरी आणि वरील अर्थाला साजेशी आणि योग्य म्हण शोधा.

(A) उचलली जीभ लावली टाळ्याला.

(B) चोराच्या उलट्या बोंबा.

(C) ज्याचे करावे बरे, तो म्हणतो माझेच खरे.

(D) बळी तो कान पिळी.

26) 'समीरण' या शब्दासाठी समानार्थी शब्द शोधा :-

(A) युद्ध

(B) वायु

(C) सूर्य

(D) वीज

27) '<u>अल्पायुषी</u>' या शब्दासाठीचा विरूद्धार्थी शब्द शोधा:-

(A) दीर्घायुषी

(B) संतुष्ट

(C) अल्पजीवी

(D) समाधानी

28) मुख्यमंत्री <u>स्वत:</u> जातीने या समारंभाला हजर राहतील. – अधोरेखित शब्दाची जी योग्य जात असेल, ती ओळखा.

(A) सामान्यनाम
(B) विशेषण
(C) संबंधी सर्वनाम
(D) आत्मवाचक सर्वनाम

29) खालील शब्दातील स्त्रीलिंगी शब्द ओळखा :-

(A) देवता
(B) भ्राता
(C) पिता
(D) नेता

30) अलीअलीकडे माझे एकमन कुठलाही नवा संकल्प करू लागले की, दुसरे मन गालातल्या गालात हसू लागते. ............. काळ ओळखा.

(A) भूतकाळ

(B) वर्तमानकाळ

(C) भविष्यकाळ

(D) यापैकी नाही

31) सगळे शिकलेले लोक मुलांस शिकवतात आणि आता मुलींनाही शिकवू लागले आहेत – या वाक्याचा प्रकार ओळखा :-

(A) केवलवाक्य
(B) शुद्धवाक्य
(C) संयुक्तवाक्य
(D) मिश्रवाक्य

32) सकर्मक कर्तरी प्रयोगाचे उदाहरण शोधा:–

(A) मुलाच्या पराक्रमाची हकीकत रंगून सांगत होते

(B) चहा करणाऱ्याने प्रत्येकाच्या द्रोणात घोट घोट चहाओतला

(C) आठ – पंधरा दिवसात त्यांची प्रकृती सुधारली

(D) आजीने त्या मूकबधिरांसाठी काही करण्याचे ठरविले

33) माणसाने नेहमी सत्कर्म करावे – या होकारार्थी वाक्याचे नकारार्थी वाक्य शोधा :–

(A) माणसाने कधीही दुष्कर्म करू नये

(B) माणसाने नेहमीच दुष्कर्म करावे

(C) माणसाने नेहमीच कुकर्म करावे

(D) माणसाने कधीतरी सुकर्म करावे

■ **खालील अपठित गद्य उतारा वाचून, त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे, दिलेल्या विकल्पातून शोधा.(34 आणि 35)**

संत इतके थोर आणि श्रेष्ठ असतात की त्यांचे वर्णन करण्यास आपली वाणी अपुरी पडते. असे तुकोबा म्हणतात. जगाचे कल्याण व्हावे म्हणून संत परोपकार करण्यात आपला देह झिजवतात. प्राणिमात्रांवर दया करणे, हाच त्यांचा मूळ स्वभावधर्म आहे. साऱ्या प्राणिमात्रांवर प्रेम करणारे संत स्वत: विषयी उदासीन असतात.

34) संतांच्या थोरवीची कल्पना कशावरून करता येते?

(A) त्यांच्या निस्पृह वृत्तीवरून

(B) त्यांचे वर्णन करण्यास शब्दच अपुरे पडतात यावरून

(C) सर्व प्राणि मात्रांवरील त्यांच्या अपार प्रेमावरून

(D) दुसऱ्यांच्या सुखात सुख मानण्याच्या त्यांच्या वृत्तीवरून

35) जगाचे कल्याण व्हावे या साठी संत काय करतात?

(A) ते परोपरकार करण्यात आपला देह झिजवतात

(B) ते आपल्या वाणीतून अमृताचा वर्षाव करतात

(C) ते प्राणिमात्रांवर प्रेम करतात

(D) ते लोकांना सन्मार्ग दाखवतात

■ **खालील काव्यपंक्ती वाचून; त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे. विकल्पातून शोधा. (36 आणि 37)**

''हरघडी अश्रू वाळविले नाहीत पण असेही क्षण आले. तेंव्हाच अश्रू मित्र होऊन साहाय्यास धावून आले. दुनियेचा विचार हरघडी केला अगा जगमय झालो दुःख पेळावे कसे, पुन्हा जगावे कसे याच शाळेत शिकलो. झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दुःखात गेले.

36) कवीच्या साहाय्यास कोण धावून आले?

(A) शेजार मंडळी

(B) नातेवाईक

(C) मित्र

(D) डोळ्यातले पाणी

37) 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दिवस दुःखात गेले' – या काव्यपंक्तीतील गर्भितार्थ शोधा:–

(A) कवीचे दोनदिवस सुखात तर दोन दिवस दुःखात गेले.

(B) कवीने क्षणोक्षणी साऱ्या जगाचा विचार केला आणि तो जगमय झाला.

(C) या काव्यपंक्तीद्वारे कवीने गरीब, श्रमिकांच्या जीवनाचा जमाखर्च मांडला आहे.

(D) कवीच्या मते जग हीच जीवनशाळा.

38) 'आर्यसमाजातून लहानाचा मोठा झालेला प्रकाश'! 'प्रकाश' हे पात्र कोणत्या पाठातील आहे?

(A) बेगड

(B) हिसका

(C) पूजा

(D) चंद्राची सफर

39) चंद्राची माहिती सांगणारे सुभाषित, जे टूरिझम खात्याने स्वीकारलेले आहे. ते सुभाषित कोणते? शोधा.

(A) नभः स्पृशम् दीप्तम् ।

(B) तमसो मा ज्योर्तिगमय ।

(C) सत्यंशिवम् सुन्दरम् ।

(D) एकः चंद्रः तमोहन्ति, न तु तारागणशतम् ।

40) 'पद्मश्री पुरस्कार', 'कुसुमाग्रज पुरस्कार', 'ज्ञानपीठ पुरस्कार', 'महाराष्ट्र राज्य पुरस्कार', यापैकी मराठी भाषेतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार कोणत्या कादंबरीला मिळाला?

(A) ययाती

(B) महानंदा

(C) टारफुला

(D) स्वामी

41) जयवंत दळवी यांनी आपल्या मित्राला कोणा – कोणाकडून नाटक मिळवून देण्याचे सांगितले?

(A) वसंत कानेटकर, कुसुमाग्रज, अनंत काणेकर यांच्याकडून नाटक मिळवून देण्याचे सांगितले.

(B) विजय तेंडूलकर, मंगेश पाडगावकर, वि.स. खांडेकर यांच्याकडून नाटक मिळवून देण्याचे सांगितले.

(C) विजय तेंडूलकर, वसंत कानेटकर, अनंत काणेकर यांच्या कडून नाटक मिळवून देण्याचे सांगितले.

(D) विष्णु वामन शिरवाडकर, प्र. के. अत्रे, रा. ग. गडकरी यांच्याकडून नाटक मिळवून देण्याचे सांगितले.

42) शिवाजी महाराजांच्या दरबारी प्रसिद्ध असा शाहीर कोण होता?

(A) दासोपंत

(B) अगीनदास

(C) रामशास्त्री प्रभुणे

(D) रामजोशी

43) कुसुमावती देशपांडे यांच्या अनेक ललित लेखन पर ग्रंथांपैकी कोणत्या ललित ग्रंथ लेख संग्रहातून 'दमडी' हे व्यक्तिचित्र घेण्यात आलेले आहे?

(A) मोळी

(B) समिधा

(C) दीपकळी

(D) दीपमाळ

44) श्रावणात येणारी पांढरी शुभ्र, वर थोडी निळसर झाक आणि पोंग्यासारखी लांबट, वास नसणारी अनाकर्षक अशा फुलाचे नाव खाली दिलेल्या विकल्पातून शोधा.

(A) धोतऱ्याची फुले

(B) तगरीची फुले

(C) श्वेतकमळाची फुले

(D) पांढऱ्याचाफ्याची फुले

45) महानुभाव संप्रदायात गोविंदप्रभूंच्या लीळांना, गोविंदप्रभूंच्या आठवणींना कोणत्या नावाने ओळखले जाते?

(A) चांगदेव पासष्टी

(B) अमृतानुभव

(C) लीळाचरित्र

(D) ऋद्धिपुरलीळा

46) वनस्पती सृष्टी विषयी ज्यांना अतिशय आत्मीयता वाटते; ज्यांचे वृक्षांशी अगदी जवळिकीची नाते आहे. म्हणूनच करवतीने कापल्या जाणाऱ्या वृक्षाचे ओंडके ज्यांना झाडांच्या हाडांसारखे दिसतात आणि त्यांना दु:ख होते. अशा विचारांचे लेखन करणाऱ्या पाठ्यपुस्तकातील पाठ – आणि लेखकाचे नाव शोधा.

(A) हरिप्रिय – नीलपंख – डॉ. सतीश पांडे

(B) चंद्राची सफर – डॉ. जयंत नारळीकर

(C) आंगण – मधुकर केचे

(D) पुराणपुरूषाला श्रद्धांजली – काकासाहेब कालेलकर

47) ‘शर्मिष्ठा’ या पाठाचा साहित्यप्रकार कोणता आहे? ते खालील विकल्पातून शोधा :

(A) ललितनिबंध

(B) व्यक्तिचित्रण

(C) भावकथा

(D) आत्मनिवेदन

48) साताऱ्या जवळ कृष्णा आणि वेण्णा या नद्यांचा संगम आहे, असे रामशास्त्री प्रभुणे यांचे गाव कोणते आहे?

(A) तुळजापुर

(B) माहुली

(C) माहुर

(D) जयसिंगपूर

49) तुमच्या पाठ्यपुस्तकातील ‘पूजा’ या पाठाधारे ‘सरबती’ या शब्दाचा संबंधित अर्थ शोधा.

(A) शरबत

(B) शब्दांचा वर्षाव

(C) गव्हाचा एक प्रकार (जात)

(D) दिव्यांची सर

50) सतत वीस वर्षे, ज्यांनी ‘ठणठणपाळ’ हे विनोदी सदर ‘ललित’ मासिकातून चालविले, त्यामूळे ज्यांच्या साहित्याशी ‘ठणठणपाळ’ हे नाव जोडले जाते. अशा साहित्यिकाचे/लेखकाचे नांव काय असावे?

(A) द.वा. पोतदार

(B) शंकर पाटील

(C) जयवंत दळवी

(D) सतीश पांडे

# 03(M)

**(MARCH, 2017)**

## (Part - B)

*Time : 2 Hours]* *[Maximum Marks : 50*

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) प्रश्नपत्रिकेत **Part - B** मध्ये चार विभाग आहेत आणि एकूण **1** ते **13** प्रश्न आहेत.
3) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. या मध्ये पर्याय दिले आहेत.
4) उजव्या बाजूला प्रश्नाचे गुण दिले आहेत.
5) नविन विभाग नव्या पानावर लिहावे.
6) प्रश्नाचे उत्तर क्रमानुसार द्यावे.

**विभाग - अ**

■ **खालील प्रश्नाचे दहा - बारा वाक्यात मुद्देसूद उत्तर लिहाः** [4]

1) डॉ सतीशपांडे यांनी 'हरिप्रिय नीलपंख' या पाठात कोणत्या पक्ष्या विषयी माहिती सांगितली आहे? त्यापक्षाचा संपूर्ण परिचय तुमच्या शब्दात लिहा :-

किंवा

दलित समाजातील प्रकाश; स्वतःच्या हुशारी बरोबरच आई - वडिलांच्या कष्टांच्या बळावर शिकून - सवरून मोठा होतो आणि नोकरीला लागतो; अशा प्रकाशचे पूर्वीचे जीवन आणि आत्ताचे जीवन यातील फरक दाखवत प्रकाशचे स्वभावचित्र रेखाटा.

■ **खालील प्रश्नाचे दोन - तीन वाक्यात उत्तर लिहाः-** [4]

2) आजी - आजोबांनी दिगंताला भावी आयुष्य उज्वळकरण्यासाठी कोणत्या सूचना दिल्या आहेत?

3) स्वामी विवेकानंदांच्या शिकागो मधील भाषणाचा श्रोतृवर्गावर काय परिणाम झाला?

किंवा

चंद्रावर जाणाऱ्या आलोकच्या यानाचे नाव सांगून; त्याने आईसाठी चंद्रावरून काय आणले?

■ **खालील प्रश्नाचे आठ – दहा वाक्यात मुद्देसूद उत्तर लिहा :–** [3]

4) 'रस्ते थकत नसतात' या वाक्याद्वारे कवीने रस्त्यांना माणसासारखे म्हणजे सजीव वस्तूचे रूप दिलेले आहे; हे कवीने कसे पटवून दिलेले आहे? ते स्पष्ट करा.

किंवा

तुमच्या पाठ्यपुस्तकातील आख्यान काव्याद्वारे जानकीच्या स्वयंवर प्रसंगाचे वर्णन करा.

■ **खालील प्रश्नाचे दोन – तीन वाक्यात उत्तर लिहा :–** [4]

5) 'दिवस झाले त्याजला किती ...........' या भूतकाळातील प्रसंगाद्वारे कवी केशवकूमार काय सांगू इच्छितात?

6) 'आयुष्य उत्तमप्रकारे शेकले गेले' , असे कवी नारायण सुर्वे का म्हणतात?

किंवा

'वैभव' या काव्यातील कवीने शेतीशी निगडित असलेल्या कोण कोणत्या शब्दांचा उल्लेख केलेला आहे? त्यापैकी शेत आणि बैल यांचे नाते स्पष्ट करा.

## विभाग – ब

■ खालील पाठ्येतर (अपठित) परिच्छेद वाचून ; त्याचा 1/3 (एक तृतीयांश) भागात सारांश लिहा व त्यास योग्य शीर्षक द्या: [5]

7) आमच्या वाट्याला जी आली नव्हती अशी अनेक सुखे चालू पिढीतल्या लहान मुलांना मिळत असतील. सुंदर सुंदर चित्रपट ती पाहत असतील, रेडिओ ऐकत असतील, शाळेतर्फे निघणाऱ्या सहलीला जात असतील, गणित, भूगोल इत्यादी ज्या विषयांची आम्हाला भीती वाटली त्या विषयांची समजूत सुधारलेल्या शिक्षणपद्धतीमुळे त्यांना अधिक असेल, त्यांना खेळावयासाठी आता क्रीडांगणे झाले असतील. त्यांच्यासाठी शहरात ठिकठिकाणी उद्याने झाली असतील. अनेक दृष्टींनी आजची ही लहान मुलं आमच्यापेक्षा अधिक भाग्याची ठरतील. परंतु ह्या मुलांना आजीचं प्रेम कसं असतं त्याची कल्पना नाही. आजीच्या चौघडीची उब ह्यांना कधी मिळालेली नाही. आमच्या लहानपणातलं आणि तारूण्यातलं अवर्णणीय संगीत व वैभवशाली नाट्य ज्याप्रमाणे काळाच्या पडद्याआड कायमचं गेलं आहे, त्या प्रमाणेच आजीचे लाड, आजीचा खाऊं, तिची कुशी, तिची भजनं ह्या गोष्टीही आता दुर्मिळ झाल्या आहेत. आजी नावाची संस्थाच झपाट्याने नामशेष होत आहे. लहान मुलांची मन अधिकाधिक संस्कारी करण्याच्या अनेक निमसरकारी खटपटी चाललेल्या बघितल्या की माझ्या गनात येत आजीच्या मायेच्या काव्यमय संस्काराला ही अभागी मुलं मुकली; त्याची वाट काय?

■ खालील पाठ्येतर (अपठित) काव्य वाचून; त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे, तुमच्या भाषेत लिहा:- [5]

8) आकाशी ध्रुवतारका बघुनिया माझ्या मना वाटते
स्थैर्यामाजी तदीय भाग्य अथवा ते पुण्य हो कोणते?
बाकीची ग्रहमालिका भ्रमतसे ही भिंगरीसारखी
जो एकाच पदी खिळून बसला तो का म्हणावा सुखी? ।।१।।
राहाया चिरकाल शीत रूचते का सागरला तरी
मागे आणि पुढे किती घुसळतो तो मस्तवालापरी
ये दैवी स्थिरता म्हणून झुरती रात्रंदिनी डोंगर
चित्तीचे कढ त्यांचिया उसळुनी क्षेंत्रात येती वर ।।२।।
सृष्टीचा जरि 'मित्र' त्याहि असती सूर्यास अस्तोदय
विश्वीं विश्रुत ''औषधीपति'' तया चन्द्रास वृद्धि-क्षय
देखा भिन्न ऋतूमुळेच वसुधा दावूं शके विभ्रम
मोहे काय तिचा विलाप अवघा तो चक्रनेमिक्रम ।।३।।
देखोनी ध्रुवतारका कधि कधि माझ्या मना वाटते
देवाने दिधला तयास वर का? की शाप हो? स्थैर्य ते।।

– महाराष्ट्रकवि यशवंत

प्रश्न :-

अ) ध्रुवतारका पाहून कवीला काय वाटते?

ब) स्थैर्य म्हणजे काय? ते इष्टनाही असे सुचविण्यासाठी कवि कोणकोणती उदाहरणे देतो?

क) ह्या सर्व - उदाहरणात तुम्हाला कोणते उदाहरण उत्कृष्ट - वाटते कां?

ड) कवीचे मन तुम्हास पटते काय? कां?

इ) कवितेला योग्य शीर्षक द्या.

## विभाग - क

9) अ.ब.क. 111 'स्वप्नपूर्ती', पत्रकार नगर , पुणे येथून - शिक्षण अर्धवट सोडून दिलेल्या मित्राला शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे पत्र लिहा:- [5]
[सूचना :- पत्रात स्वत:चे नाव, पत्ता किंवा स्वाक्षरीचा उल्लेख करू नये.]

10) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दहा - बारा ओळीत कल्पनाविस्तार लिहा:- [5]

अ) न लगे धन, मुक्ति संपदा। संतसंग देई सदा ।।

ब) केल्यावीण सांगो नये आपुला पराक्रम ।

## विभाग - ड

11) सूचनेप्रमाणे करा :- [3]

- खालील शब्द शुद्ध करून पुन्हा लिहा:-
  - अ) अवीस्मरणिय
  - ब) अंतरराष्टिय
- संधी सोडवा :-
  - अ) वनौषधी
  - ब) देव्यौदार्य
- संधी करा :-
  - अ) विद्युत + लता
  - ब) पुन: + आगमन

12) खाली दिलेल्या मुद्यांवरून 100 शब्दात गोष्ट तयार करा; त्यांस योग्य शीर्षक द्या :- [4]

- दोन मित्र —— यात्रेसाठी प्रवास —— जंगलातून मार्ग —— अस्वल दिसणे —— एक मित्र घाबरून झाडावर चढतो —— दुसरा जमिनीवर पडून राहतो —— अस्वल दुसऱ्या मित्राच्या कानाजवळ तोंड नेऊन हुंगणे —— तो श्वास रोखून ठेवतो —— मेलेला समजून अस्वल पूढे निघून जाते —— पहिला मित्र झाडावरून खाली येतो —— दुसऱ्या मित्रास विचारतो —— 'त्या अस्वलाने कानात काय सांगितले?' —— दुसऱ्याचे उत्तर —— दगाबाज मित्रांची संगत धरू नकोस.

किंवा

- तुमच्या शाळेतील गांधीजयंती निमित्त 'स्वच्छता अभियान' अन्तर्गत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत जो कार्यक्रम संपन्न झाला; त्या कार्यक्रमाचा अहवाल लिहा:-

13) खालीलपैकी कोणत्याही एका सुमारे 200 शब्दात निबंध लिहा. [8]

अ) आरक्षण - माझे विचार :-

मुद्दे:- आरक्षण असावे की नसावे? याबद्दल विद्यार्थ्यांत चर्चा —— चर्चेला वितंडवादाचे स्वरूप —— आरक्षणामागची सामाजिक न्यायाची आणि समतेची दृष्टी —— हजारो वर्षे अज्ञान दारिद्र्य, अत्याचार सहन करणारे पददलित, आदिवासी यांसारखे उपक्षित लोक —— अन्याय सहन करत आदमोन्नतीचा प्रयत्न करणारा व संधी न लाभलेला यांच्यात स्पर्धा —— स्पर्धेसाठी एकाच पातळीत हवेत —— उपेक्षितांना, आदिवासीयांना बरोबरीत आणण्यासाठी आरक्षण आवश्यक —— आरक्षणाचा फायदा —— मागासलेल्यांना, जातीतील सुधारलेल्यांना आरक्षणातून वगळणे आवश्यक —— आरक्षण कायम ठेंवून त्यातही आर्थिक निकष जरूरीचे —— त्यायोगे मागासलेल्यातील अतिमागासलेल्यांना लाभ देणारा मंडल आयोग —— समर्थन व टीका.

ब) आम्ही नवभारताचे शिल्पकार :-

मुद्दे:- भारतीय स्वातंत्र्याला पन्नासहून अधिक वर्षे —— समस्या संपल्या नाहीत —— जगात समर्थ राष्ट्र कसे बनेल? —— कृषी, औद्योगिक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती —— संगणकाच्या युगात —— स्वातंत्र्यानंतर अनंत अडचणी —— त्यावर मात —— निस्सीम देशनिष्ठा, कार्यनिष्ठा —— प्रेरणादायी आदर्श —— सर्व क्षेत्रे काबीज —— लोकसंख्या मोठी —— कर्तबगार हात —— नवभारताचे शिल्पकार ——